नि.दि.दा. १०१/२०१६

नि.क्र. ४० सोबत

**<u>वादी क्र. १ चा उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्र. १ तर्फे विधीज्ञ श्री.पी.जी.इंगळे यांचेमार्फत शपथेवर सुरु–</u>**

१२. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ४५३ च्या पश्चिमेस गट क्रमांक ४५७ आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्रमांक १ व प्रतिवादी क्रमांक १ यांच्या जमीनीच्या पश्चिमेला गट क्रमांक ४५७ मध्ये लक्ष्मण सोनबा खेतमाळीस व ज्ञानदेव रामभाऊ खेतमाळीस यांची ३ आर शेतजमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे क्षेत्र आमच्या जमीनीच्या लगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे ३ आर क्षेत्र लक्ष्मण सोनबा खेतमाळीस व ज्ञानदेव रामभाऊ खेतमाळीस यांनी १९८६ साली तबाखेतमाळीस यांचेकडून खरेदी घेतलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर ३ आर क्षेत्राच्या उत्तरेला माझ्या वडीलांनी रस्ता ठेवला होता. दावा मिळकत ही वादी क्रमांक २ ला वाटपाने मिळाली आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

**प्रश्न –** दावा मिळकत ही वादी क्रमांक २ ला खरेदीने आली असे तुम्ही दाव्यामध्ये व शपथपत्रामध्ये खोटे नमुद केले आहे.
**उत्तर –** ते चुकून नमुद झाले असावे.

१३. हे म्हणणे खरे नाही की, मोजणी अंती आमचे जे क्षेत्र कमी भरत आहे ते रस्त्यामध्ये गेलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रमांक १ याच्या नावावर जे जास्त क्षेत्र दिसत आहे ते देखील रस्त्यामध्ये गेलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे तसेच मोजणी नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रतिवादी क्रमांक १ याने आमच्या मिळकतीवर कोणतेही अतिक्रमण केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वहिवाटीसाठी ठेवण्यात आलेल्या रस्त्याचे क्षेत्र आम्हाला मिळावे म्हणून आम्ही खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल

करुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण,**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

ठिकाणः श्रीगोंदा **(एच. जे. पठाण)**

दिनांक ०६/०७/२०२४. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, श्रीगोंदा